REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 3 | DECEMBER – 2017

# पाणी! पाणी! या कथासंग्रहातील पाणी समस्या-एक चिकित्सा

प्रा.कदम एन.एस.
यशवंतराव चव्हाण, महाविद्यालय तुळजापूर.

## प्रास्तविक:

साठोत्तरी काळात रूढ झालेला ग्रामीण साहित्याचा प्रवाह 1980 नंतर अधिकाधिक प्रगल्भ होताना.दिसतो समाजजीवनाच्या सर्वस्तरात अमुलाग्र व अविश्वनीय बदल घडून आला.याचे थेट परिणाम मराठी साहित्यावरही झाल्याचे दिसते.या कालखंडात लेखकांनी सभोवतालच्या वास्तवाचे आणि उदभवणाऱ्या जीवघेण्या समस्यांचे चित्रण आपल्या साहित्यातून नेमकेपणाने साकारतात.त्याच्या लेखनातून सामाजिक बांधिलकी आणि संवेदनशीलतेचे प्रत्यंतर येते.

या कालखंडात समाजकारण, राजकारण, संस्कृती संबंध, मानवी नातेसंबंध व जीवनशैली या सर्वच स्तरावरती समाजात कमालीची बदल घडून आला.आपल्या जगण्याला लेखनाचे विषय बनवून समाजातील सर्वच स्तरातील वास्तव जीवनानुभव साहित्यातून साकार होऊ लागले भौतिक बदलाचे परिणाम जसे साहित्यातून प्रतिबिंबित होतात. वर्षा आड वर्ष सातत्यांने पडणाऱ्या दुष्काळामुळे मानवी जीवनात होणाऱ्या प्रचंड उलथापालथीचे वास्तव चित्रण या काळात अत्यंत ठोसपणे कथालेखन करून कथाकार म्हणजे लक्ष्मीकांत देशमुख होय.त्याच्या पाणी! पाणी!या कथासंग्रहातून दुष्काळामुळे निर्माण झालेल्या समस्या लक्ष्मीकांत चे वेगवेगळे पैलू अधोरेखित केले आहेत.या कथासंग्रहातील दुष्काळ समस्येचे चित्रण करणार्या कथा:ची विविधता आणि शेवटचा प्रस्तुत शोधनिबंधाच्या अनुषंगाने विचारत घेतल्याचा प्रयत्न केला आहे.

- **लक्ष्मीकांत देशमुख: व्यक्तीतत्व व कथालेखन:**

1980 नंतरच्या पिढीतील एक महत्त्वाचे लेखक म्हणजे लक्ष्मीकांत देशमुख होय.आपल्या लेखनशैली च्या वेगळेपणातून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.कथा कांदबरी ललित नाटक आदी वाड्मयीन प्रकारातून त्यांनी विपुल लेखन केले आहे.ग्रामीण भागात जन्मला आलेले देशमुख सामाजिक जीवनाशी एकरूप झाले . उस्मानाबाद जिल्हयातील मुरूम सारख्या खेड्यात त्याचा जन्म 5सप्टेबर 1954 रोजी झाला.विज्ञान शाखेतून एम एस्सी ची पदवी घेऊन ते प्रशासकीय सेवेत जिल्हाअधिकारी म्हणून कार्यरत होते. रसायनशास्त्र तून पदव्युत्तर पुढे शिवाजी विद्यापीठातून मराठी विषयात एम ए ची पदवी घेतली.




ग्रामीण समाजात बालपण गेले तर सनदी अधिकारी म्हणून काम करीत असताना समाजातील प्रत्येक प्रश्न संवेदनशीलतेने आणि

न्यायबुधदीने सोडविले ही अनुभव संपन्नता देशमुख यांच्या व्यक्तीमत्वातील साहित्याकाला परिपक्व करत गेली यातूनच विपुल साहित्य संपदा काराला आली.अखेरची रात्र (नाटक) अग्निपथ कथासंग्रह.अँडमिनीस्ट्रेशन गुड अँन्ड ग्रेटनेस इग्रजी वैचारीक, आतरीच्या गुढगर्भी कथासंग्रह अंधेरीनगरी कादंबरी अन्वयार्थ नाटक त्याच बरोबर पाणी!पाणी! कथासंग्रह इत्यादीविपुल लेखन केले आहे .त्याना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कार विविध संमेलनाचे अध्यक्ष व अखिल भारतीय 91व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष कोणत्याही साहित्यकाला हा सन्मान सर्वोच्च पुरस्कार असतो.

आपल्या प्रशासकीय सेवेच्या कालावधीत समाजातील वेगवेगळ्या प्रार्थना जाणून घेणारा देशमुखांची अनुभव संपन्नता साहित्य लेखनास प्रेरणा ठरली.यातूनच समाजातील वेगवेगळ्या प्रश्न कथालेखनातून साकार झाले.''डाँ रणधीर शिंदे विशेष अधोरेखित करताना लिहीणार सामाजिक जीवनाची समाजचित्रे हा एक त्यांच्या कथा लेखनाचा विशेष आहे. पाणी टंचाई,स्त्री भ्रूणहत्या, बालमजुरी ते मुस्लिम स्त्रीयांची दु:खे अशा समस्याना चर्या मध्ये स्थान आहे.

या प्रश्नचा विविधांगीशोध त्यानी दलीत साहित्यातून घेतला आहे.एक जागरूक लेखक म्हणून त्यांच्यात आजच्या काळाचा.समाजजीवनाचा निरीक्षक दडलेला आहे.''देशमुख यांचे व्यक्तीत्व व साहित्यलेखन यांचे परस्परावलंबी स्पष्ट होते.त्याच्या या सामाजजीवनाच्या आकलनाततूनच त्याची 'पाणी! पाणी!'या कथामालातून सिध्द झाला आहे.

पाणी! पाणी! याकथासंग्राहातील दुसऱ्या अनेक कथांतून दुष्काळाची कारणे व परिणामाचे नेमके चित्र साकार केले आहे.महाराष्ट्रात दुष्काळ हा स्वातंत्र्याने उद्भवणारी एक जीवघेणी समस्या आहे.दुष्काळाची प्राचीन परंपरा महाराष्ट्रीय जीवनात दिसून येते.इतिहासातील अनेक दुष्काळ हे मानवी जीवनात हानी करणारे ठरले आहेत.साहित्यकांच्या सामाजिक बांधिलकीतून आलेली ही दुष्काळाची चित्रांचे दुष्काळाची विविधता आणि शेवटचा प्रत्यास येते 1972साली झालेल्या दुष्काळाने संपूर्ण महाराष्ट्र होरपळून निघाला होता.त्याचे परिणाम या काळात निर्माण झालेल्या साहित्यातून अधोरेखित होतात.साहित्यक समकालीन वास्तवाला कलात्मक प्रतिक्रिया देत असतो जीवनावर भाष्य करतो.त्याचे प्रतिबिंबत्यांच्या. साहित्यातून उमटताना दिसून येते

वैचारिक लेखन ही वेगळ्या अर्थाने सर्जनशीलताच असते त्यात ही स्वतंत्र विचार मांडले असतात यातून ही तत्कालीन परिस्थितीत सजग राहून लेखक लेखन करतो तेव्हा त्याचे सामाजिक भान प्रकट होते. डॉ मरू सावंत यांनी लेखक समकालाशी कसा संवाद साधतो ते स्पष्ट होते

देशमुखांचा जन्मच दुष्काळी प्रदेशात म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उस्मानाबाद जिल्ह्यात झाला आहे.बालपणापासून प्रत्यक्ष अप्रत्यक्ष झळा त्यांना सोसाव्या लागल्या आहेत.पुढे जिल्हाधिकारी म्हणून काम करताना प्रत्यक्ष त्यातील ताणेबाणे अनुभवले आहेत.

देशमुखांच्या पाणी! पाणी! या कथासंग्रहातील कथांतून दुष्काळातून येणारी नापिकीमुळे होणारी कर्जबाजारीपणा त्यातून निर्माण झालेले दुष्ट चक्र यांचे दर्शन घडते .दुष्काळाने बदलत जाणाय्रा मनोवृत्ती चे वेगवेगळे पैलू देशमुख कलात्मकतेने उभे करतात.त्य पार्श्र्वभूमीवर होणारे राजकारण आणि त्यातून सामान्य माणसाच्या वाट्याला येणारी उपेक्षा प्रभावी पुणे मांडतात 'पाणी चोर' या कथेतून घडते बदलत्या परिस्थितीत गरीबांच्या आयुष्याचे राजकारण करून नैसर्गिक दुष्काळाने पिचलेल्या माणसाच्या आयुष्यात मानवी दुष्काळ निर्माण करून त्यांच्या आयुष्याला संघर्ष मत करून सोडतात.. सामान्य माणूस. पिण्याच्या पाण्याला मोताद होतात .ही सर्व सामान्य माणसाच्या मनातील खंत सर्व सामान्य माणसाचे प्रतिनिधित्व करते.

दुष्काळ आणि जात वास्तव ' या कथेतून प्रत्ययकारी रितीने 'लढवय्या' या कथेतून प्रत्ययकारितेने येते.देशाची सेवा करुन फौजी महादू गावी परततो त्याला सिलींगची पाच एकर जमीन कसत असतो .गावचा दाजीबा पाटील यांची जमीन खटपटी करून महादूला मिळू दिली जात नाही.दुष्काळी काम महादूच्या शेतात पाझर तलाव व्हावा..तो जमीन

शेतमजूर ना काम मिळावे म्हणून देतो पण दाजीबा पाटला विरूद्ध लढत राहतो.आपल्याच घरभेदी माणसाने सामान्य माणसाचे जीवन उध्दवस्त होते.तर बांधा ही कथा दुष्काळाने उध्दवस्त कुटुंबाचे भयावह चित्र उभे करतात.तर गजरा कथेतून ग्रामीण स्त्रीचे मनोहारी दर्शन घडवतात.गजराच्या जिद्दीने आणि चिकाटी चे वर्णन स्त्रीयांचे स्वभावृत्ती अधोरेखित होतात.दुष्काळात ही स्त्री कुटुंबाला सावरण्यासाठी तयार आहे धनी या अस्मानी सुलतानी नं भरल्या भरल्याची जिरली,पण तुमचे पाय जमिनीवर कधीच आले नाहीत कष्ट करायची थांबायची सवयच नाही.तुमास्नी लाज वाटते म्हणून डोईवरचा पदरन घसरणाग्रा गुजरातला ओढा मारून रोजगार हमी वर मंजूर म्हणून जावं लागतं

घरासाठी आणि पाखरांसाठी घास कमवीत नाही.तर कंडम कथेतून पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण होऊन वाढविलेल्या परिस्थिती चे चित्र येतेसमाजातील किळसवाणी जातीयता या फेग्रात भारताची ही कथा विचार प्रवृत्त करून सोडते.

एकूणच लक्ष्मीकांत देशमुख पाणी! पाणी! या कथासंग्रहातील अनेक कथांतून दुष्काळाचं मानवी मनोवृत्तीवर परिणाम सर्वसामान्य माणसाच्या वाट्याला येणारी जीवघेणे जीवनानुभव प्रत्ययकारी रितीने चित्रीत करतात.शासन व्यवस्था आणि चर्या ठिकाणी होणारी सर्वसामान्य माणसाचे शोषण वास्तव रेखाटून लक्ष्मीकांत देशमुख केवळ नैसर्गिक नव्हेतर मानव निर्मित दुष्काळाचे वेगवेगळे पैलू अधोरेखित करतात.

## संदर्भ

1) रणधीर शिंदे, महाराष्ट्र साहित्य पत्रिका,आक्टो.ते डिसें2017
2) डॉ मधू सावंत, प्रतिष्ठान,दुष्काळ आणि मराठी साहित्य, नोव्हेंबर.डिसे 2016
3) आसाराम लोमटे, प्रतिष्ठान दुष्काळ आणि मराठी साहित्य नो.डि.2016
4) लक्ष्मीकांत देशमुख, पाणी! पाणी!-चोर,पृ12
5) दता भोसले साहित्य आस्वाद आणि अनुभव पृ13 इत्यादी.